International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
**Golden Research Thoughts**
ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052 (UIF)
Volume - 4 | Issue - 12 | June - 2015 Available online at www.isrj.org

# 2015-2016 चे अंदाजपत्रक मुलनिवासी बहुजनासाठी गुलाम बनविणारा अर्थसंकल्प

**सुभाष राठोड**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख , प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण जि. औरंगाबाद.**

Short Profile :
Subhash Rathod is Head of Department of Economics at Foundation College, Paithan Dist . Aurangabad.




### *प्रस्तावना* :

अर्थमंत्री अरुण जेटली यांनी संसदेमध्ये आर्थिक सर्वेक्षण 2014-15 सादर केले. अर्थमंत्रालयाचे मुख्य सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी आर्थिक सर्वेक्षण तयार केले. सुधारीत अंदाजानुसार 2015-16 चे अंदाजपत्रक किंवा अर्थसंकल्प हे चालू वर्षासाठी अंदाजित उत्पन्न व प्रस्तावित खर्च याचा समावेश केलेला असतो आर्थिक वर्ष म्हणजे **1 एप्रिल 2015 ते 31 मार्च 2016** साठी तयार केलेला असतो.

1) जर अंदाजित उत्पन्न हे प्रस्तावित खर्चापेक्षा अधिक असेल तर अशा अंदाजपत्रकास शिल्लकीचे अंदाजपत्रक असे म्हणतात.

2) अंदाजित उत्पन्न पेक्षा प्रस्तावित खर्च अधिक असेल तर अशा अंदाजपत्रकास त्रुटीचे अंदाजपत्रक म्हणतात.

3) अंदाजित उत्पन्न व खर्च एकसमान असेल तर अशा अंदाजपत्रकास समतोल अंदाजपत्रक असे म्हणतात.

भारत सरकारच्या वित्तीय मंत्रालयाकडुन तयार केले जाते आणि वित्तमंत्री लोकसभेत सादर करतात. एकदा अंदाजपत्रकाला (अर्थसंकल्प) ला मंजुरी मिळाली की नंतर त्यावरील अंमलबजावणी चालू होते. अर्थसंकल्प हे भुतकाळ व भविष्यकाळावर दृष्टीक्षेप टाकणारा दस्तावेज असुन त्यामध्ये तीन गोष्टीचा समोवश असतो.

1) मागील वर्षातील जमा खर्चाचा हिशोब.
2) चालू वर्षासाठीचे अर्थसंकल्प व सुधारीत अंदाजपत्रक.
3) पुढील वर्षासाठीचे अर्थसंकल्पीय अंदाज.




### .वरील तक्याचे विश्लेषण:-

1) 1 एप्रिल 2015 ते 31 मार्च 2016 साठीचा भारताचा अर्थसंकल्प 17,77,477 कोटी रुपये आहे.
2) या वर्षासाठी एकुण उत्पन्न 17,77,477 कोटी रुपये आहे.
3) 2015-16 साठी एकुण खर्च 17,77,477 कोटी रुपये आहे.
4) करच्या माध्यमाने 9,19,842 कोटी रुपये जमा होणार व करेत्तराच्या माध्यमाने 2,21,733 कोटी रुपये जमा होणार असा अंदाज पक्का आहे. याला महसुली उत्पन्न म्हणतात.
5) चालू वर्षात Recoveries of Loans च्या माध्यमाने 10,753 कोटी रुपये जमा होणार व इतर उत्पन्नाच्या माध्यमाने 69,500 कोटी रुपये जमा होणार तसेच (उधार व अन्य) माध्यमाने 5,55,649 कोटी रुपये जमा होणार असे एकूण भांडवली प्राप्ती (उत्पन्न) 6,35,902 कोटी रुपये जमा होणार अशी संसदेत मंजुरी मिळाली.

6) भारताच्या 31 राज्याच्या विकासासाठी योजना खर्च महसूली खात्यावर 3,30,020 कोटी रुपये खर्च करणार आहेत तसेच भांडवली खात्यावर 1,35,257 कोटी रुपये खर्च करणार आहेत अशी संसदेत मंजुरी मिळाली आहे. असे योजनासाठी एकुण 4,65,277 कोटी रुपये खर्च करणार आहेत.

7) महसुली खात्यावर 12,06,027 कोटी रुपये खर्च होणार आहे व खर्च करणार आहेत तसेच भांडवली खात्यावर 1,06,173 कोटी रुपये खर्च करणार आहेत असा एकुण योजनात्तर खर्च (विकासेत्तर खर्च) Non Plan Expenditure एकुण अर्थसंकल्पमधून 13,12,200 कोटी रुपये खर्च करणार आहेत अशी संसदेत मंजूरी झाली असा अंदाजपत्रक आहे.

2015-2016 या अर्थसंकल्पात महसूल प्राप्ती भांडवली प्राप्ती, योजना खर्च व योजनेत्तर खर्च याचे विश्लेषण व तुलना पूढीलप्रमाणे करण्यात येईल.

### 1) महसूल प्राप्ती :-

सरकारचे असे मौद्रिक उत्पन्न ज्यामुळे सरकारला देणी निर्माण होत नाहीत किंवा मालमत्तेत घट होत नाही. यामध्ये साधारणत: कर व करेत्तर मार्गाने उत्पन्न मिळते.

### अ) कर उत्पन्न :-

र उत्पन्न म्हणजे असे एकुण उत्पन्न की सरकारला कर किंवा शुल्क आकारल्यामुळे मिळते या प्रकारच्या उत्पन्नामध्ये सरकार सक्तीने कर वसूल करुन उत्पन्न वाढवू शकते हे एक प्रमुख व नियमीत उत्पन्नाचे साध-न म्ह-न ओळखले जाते. यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश आहे. उदा. उत्पन्न कर, मालमत्ता र अप्रत्यक्ष कराच्या बाबतीत कराघात व कारभार वेगवेगळ्या व्यक्तीवर होतात. भारताच्या एकूण निव्वळ कर व राजस्व (Centreis Tax Revenue) 9,19,842 कोटी रुपये जमा होणार.

### ब) करेत्तर उत्पन्न :

रेत्तर उत्पन्नामध्ये प्रामुख्याने कर्जावरील व्याज, गुंतवणुकीतील लाभांश, सार्वजनिक उद्योगाचा नफा, अनुदा-ने, देगी, दंड याद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश ज्यामध्ये व्याज (23600 कोटी रु.) गुंतवणूकीवरील लाभांश (1,00,651 कोटी रु.) आणि लाभ विदेशी अनुदान (1774 कोटी रु.) अन्य कर-थिन्न राजस्व (94,412 कोटी रु.) संघ राज्य क्षेत्रों की प्राप्तीया (1296 कोटी रु.) असे एकुण 2015-16 मध्ये 2,21, 733 कोटी रुपये करेत्तरच्या माध्यमाने जमा होणार.

**2) भांडवल प्राप्ती :-**

भांडवल प्राप्ती म्हणजे मौद्रीक उत्पन्न ज्यामुळे सरकारची देणी वाढतात. भांडवली प्राप्तीत तीन विभागात वर्गीकरण केले जातात. एकुण 6,35, 902 कोटी रु. तरतुद आहे.

**अ) सार्वजनिक कर्ज :-**

□ार्च भागवण्यासाठी सरकारने घेतलेले अंतर्गत व बर्हीगत कर्ज हे भांडवली खात्यावरील प्राप्तीचा महत्त्वाचा भाग आहे. संस्था, जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय नावे निधी यांच्या कर्ज घेवु शकतात.

**ब)कर्जाची वसुली :-**

सरकारने भूतकाळात दिलेली कर्जे वसुली केली जाते त्या माध्यमाने 2015-16 साठी 10,753 कोटी रुपये आहे.

**□)इतर प्राप्ती :-**

या घटकामध्ये निर्गुंतवणूकीच्या माध्यमातुन मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश होतो. विशेष ठेवी, राज्य निर्वाह ठेवी, निर्गुंतवणूक म्हणजे एखाद्या उद्योगातील सरकारची हिस्सेदारी खाजगी व्यक्ती किंवा उद्योगाला विकण्याची प्रक्रिया आहे. या माध्यमाने 69,500 कोटी रुपये तरतूद केली आहे.

**3)योजना खर्च :-**

स-न 2015-2016 साठी योजना खर्चासाठी (Plan Expenditure) 4,65,277 कोटी रुपये आहे. योजना खर्च म्हणजे हे खर्च म्हणजे हे खर्च म्हणजे केंद्र सरकारचा योजना खर्च तसेच राज्याचा व केंद्रशाशित प्रदेशाना योजना खर्चासाठी दिलेले अनुदान असे शेती, जलसिंचन, ग्रामीण विकास दारीद्र्य निर्मूल-न, विज्ञान व तंत्रज्ञान इत्यादीवर खर्च केला जातो.

अ)महसूली खर्च (Total Revenue / Plans Expenditure)

महसूली खर्च म्हणजे ज्यामध्ये सरकारच्या मालमत्तेत वाढ होत नाही. महसुली खर्च हे दैनंदिन खर्च किंवा चालू खर्च होय. महसूली खर्च है दैनंदिन खर्च किंवा चालू खर्च होय. महसूली खर्चामध्ये प्रामुख्याने प्रशासन व्यवस्था वरील खर्च, कायदा, सुव्यवस्था, न्याय व्यवस्था, सबसीडी आणि सामाजिक सेवा जसे शिक्षण, आरोग्य यावरील खर्चाचा समावेश होतो. असा एकूण 3,30,020 कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद आहे.

**ब)भांडवली खर्च (Total Capital Plan Expenditure)**

सरकारचे खर्च ज्यामुळे सरकारच्या भौतीक किंवा वित्तीय संपत्तीत वाढ होते जमीन, बिल्डींग, यंत्रसामग्री, साधने/ शेअर्स मधील गुंतवणुक या गोष्टीवर केलेला खर्च होय. यासाठी चालू वर्षात 1,35,258 कोटी रुपये खर्च होणार आहे.

4) योजनेत्तर खर्च (Non Plan Expenditure)

अ) Revenue Expenditure (राजस्व व्यय) (कोटी रुपये)

| | | |
|---|---|---|
| i) | व्याज संदाय और पूर्वदत्त प्रीमीयम (Interest payment and prepayment premium) | 4,56,145 |
| ii) | रक्षा सेवांए (Defense Service) | 1,52,139 |
| iii) | सबसिडी (Subsidies) | 2,43,811 |
| iv) | राज्य और संघ राज्य क्षेत्र की सरकारों को अनुदान (Grants to state and U.T. Governments) | 1,08,552 |
| v) | पेंश-ा (Pensions) | 88,521 |
| vi) | पुलिस (Police) | 51,791 |
| viii) | अन्य सामान्य सेवाएं (राज्य के अंग, कर संग्रहण, वैदेशिक कार्य, आदि) Other General Service (Organce of State Tax collection, External affairs etc.) | 30,936 |
| ix) | सामजिक सेवांए (Social Services) (शिक्षा, स्वास्थ्य, प्रसारण, आदि) Education, Health, Broadcasting | 29,143 |
| x) | आर्थिक सेवांए (Economic Services) (कृषि, उद्योग, विद्युत, परिवहन, संचार, विज्ञान और प्रौद्योगिक) (Agriculture, Industry, Power, Transport, Communications, Science & Technology) | 28,984 |
| xi) | डाक घाटा (Postal Deficit) | 6,665 |
| xii) | विधानमंडळ रहित संघ राज्य क्षेत्रो का व्यव | 4,998 |
| xiii) | विदेशी सरकारों को अनुदान (Grants to foreign Governments) | 4,342 |
| | चालू वर्ष 2015-16 साठी योजनेत्तर एकुण खर्च रपये आहे. | 12,06,027 |

ब) पुंजी व्यय (Capital Expenditure)

| | | |
|---|---|---|
| i) | रक्षा सेवाएं (Defense Services) | 94,588 |
| ii) | आयोजना भिन्न पुंजी परिव्यय<br>(Non Plan Capital Quality) | 10,582 |
| iii) | सरकारी उधमो को श्रण<br>Loans to public enterprises | 954 |
| iv) | राज्य और संघ राज्य क्षेत्र की सरकारो की श्रण<br>(Loans to state and U.T. Governments) | 79 |
| v) | विदेशी सर□ारो □ो श्र□<br>Loans to foreign Governments | 158 |
| vi) | अन्य Others | -188 |
| | 2015-16 साठी भांडवली खर्च एकुन (Total)<br>रुपये तरतुद आहे. | 1,06,173 कोटी |

## □द्रीय अर्थसंकल्प (Central Budget)

एखाद्या देशाचा अर्थसंकल्प म्हणजे पुढील वर्षात कोणत्या मार्गाने उत्पन्न जमा करणार व जमा झालेले उत्पन्न कोणत्या पध्दतीने खर्च करायचे याचा आराखडा हाच अर्थसंकल्प असतो. अर्थसंकल्पाचा उद्देश असा की, उपलब्ध असलेल्या भौतिक व वित्तीय साधनाचे समान प्रमाणात वितरण करणे अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करुन देणे हेच सर्वात महत्त्वाचा उद्दिष्ट आहे. महसूल प्राप्ती, भांडवली प्राप्ती, योजना खर्च व योजनेत्तर खर्च या चार बाबीवर केंद्रीय अर्थसंकल्प आहे. तुलना पूढील प्रमाणे करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | विवर□ | □ोटी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | व्याज (Interest Payment and debit) | 4,56,145 | 25.66% |
| 2 | संर□□ (Defence) | 2,46,727 | 13.88% |
| 3 | उर्जा (Energy) | 1,67,342 | 9.41% |
| 4 | वाहतुक (Transport) | 1,93,417 | 10.88% |
| 5 | महीला व बाल □ल्या□ | 9,694 | 0.54% |
| 6 | पे-श-ा (Pensions) | 88,521 | 4.98% |
| 7 | शि□□ (Education) | 46,430 | 2.61% |
| 8 | आरोग्य (Health) | 23,804 | 1.33% |
| 9 | म-रे□ा<br>(महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी योजना) | 34,699 | 1.95% |

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | �षी (Agricultrure) | 11,657 | 0.65% |

1) पेन्शन साठी 2014-15 साठी 81705 कोटी रुपये ची आर्थिक तरतुद होती. तर 2015-16 मध्ये 88,521 कोटी रुपये म्हणजेच 6816 कोटी रुपये पेन्शनच्या जनतेसाठी वाढ करण्यात आली हा संवीधानीक हक्क आहे. कृषीसाठी केन्द्रीय आयोजन 2013-14 मध्ये 17788 कोटी रुपये बजेट, तरतुद होती. तर 2015-16 मध्ये 11657 कोटी रुपये म्हणजेच 6131 कोटी रुपये कमी करण्यात आले काय संसदेत चर्चा होत असताना याची माहीती खाजदाराना माहिती नाही? एकुन अर्थसंकल्प मधुन Pensions (पेन्शस) धारकांना 4.98 टक्के बजेटमध्ये तरतुद होते व कृषी क्षेत्रावर 0.65 टक्के आर्थीक तरतुद होते की जो 85% समाजातील 65 टक्के जनता शेतीवर अवलंबुन आहे ही किती तफावत आहे. याचा अर्थ 85% बहुजनातुन सच्चा प्रतिनीधी एकही नाही. म्हणुन कृषी क्षेत्राला तरतुद केली जात नाही.

2)स-ा 2014-15 मध्ये शिक्षणावर एकुन खर्च 50, 693 कोटी रुपये तरतुद होती ते सन 2015-16 च्या अर्थसंकल्पामध्ये 46,430 कोटी रुपये करण्यात आली आहे म्हणजेच 4,263 कोटी रुपये घट करण्यात आली. शि��ा विभा� हा सर्वात मोठा विभाग आहे. उच्च शिक्षणामूळे संशोधक निर्माण होतात. भारतासारख्या ठिकाणी शिक्षणावर फक्त 2.61 टक्के खर्च करण्याची तरतुद केली आहे. याचा अर्थ मूलनिवासी बहुजनांना गुलाम बनविण्याचे षडयंत्र आहे.

3)वरील तक्यामध्ये संरक्षण (Defence) साठी आर्थीक तरतुद 2014-15 साठी 2,22,370 कोटी रुपये तरतुद होती तर 2015-16 साठी 2,46,727 कोटीची तरतुद आहे. म्हणजे Defence Expenditure मध्ये 24,357 कोटी रुपये खर्च वाढ करण्यात आला आहे. म्हणजे संरक्षणासाठी एकुन बजेट मधुन 13.88 टक्के आर्थीक तरतुद करावी लागले. देशातील आरोग्य सुध्दा जनतेचे संरक्षण आहे त्यासाठी मात्र एकुन अर्थसंकल्प मधुन 1.33 टक्के म्हणजेच 23,804 कोटी हेल्थ साठी तरतुद केली जाते आजच्या परिस्थीतीत सर्वसामान्य जनतेला आरोग्याचेही संरक्षण नाही. 85% बहुजन समाज जागृत होत आहे. मूलनिवासी बहुजन समाजाला अर्थसंकल्पातील तरतुद किती मोठ्या प्रमाणात विषम वाटप होत आहे. जेणे करुन ग्रामीण भागातील जनता व्यवस्थेच्या विरोधात उग्र स्वरुपात आवाज उठवत आहे.

## सारांश :-

भारत हा कृषी प्रधान देश होता परंतु 1991 च्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतातील 65 टक्के लोक शेती व मजूरीवर अवलंबून आहे. आर्थीक तरतुद जर तुटपूंजी करत असतील तर शेतकरी हा भीकारी बनत आहे. पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी भटकंती करावी लागते. स्वातंत्र्याच्या 68 वर्षात भारतातील जीवनावश्यक वस्तु पासून सेन गुप्ताच्या अवाहलानूसार 83 करोड लोक दिवसाच फक्त एक वेळचे जेवन करतात. देशात शेतकरी कर्जबारीपणामुळे, दुष�ाळमुळे, काम मिळत नसल्यामुळे 2005 पर्यंत भारतात 1,66,204 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत यामध्ये एकही ब्राम्हण व

बनीया नसेल आजचा शेतकरी हवालदील झाला आहे. 2014-15 मध्ये महाराष्ट्र राज्यातील अनेक भागात शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील निघाला नाही.

भारतीय जनता पार्टी स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षी म्हणजे 2022 ला 'मेक इन इंडीया' बनवणार याचा काय अर्थ आहे आपण पाहू:-

येत्या 2022 मध्ये भारतीय स्वातंत्र्याच्या 75 वर्षे पूर्ण होणार या अनुषंगाने विशेष कार्यक्रम राबवीणार अशी मुलनिवासी बहुजनाला 'हळकुंड' दाबवण्याचा प्रकार आहे. काय घोषणा करता हे...

1) प्रत्येक कूटूंबाला घर
2) प्रत्येक कुटूंबात किमान एका व्यक्तीस नौ□री
3) 24 तास वीज
4) मुबल□ पा□ी
5) 100 टक्के स्वच्छतागृहे
6) पूर्णत: दारिद्रयाचे निर्मुलन
7) सर्व गावांना जोडण्याकरीता एक लक्ष किलोमीटर लांबीचे रस्ते
8) प्रत्येक गावात आरोग्य सेवा
9) 5 कि.मी. आंतराच्या आत माध्यमिक शाळा

असा 'मेक इन इंडीया' चा कार्यक्रम बीजेपी राबवत आहे. म्हणजेच 85% मुलनिवासी बहुजन समाज भारतीय जनता पार्टीला मत देणार, किंवा जनता विरोधात जाणार नाही. सर्वसामान्य जनता आता जानकार झाली आहे उदा. प्रत्येक कुटूंबात किमान एक व्यक्तीस नौकरीस लावणार असे म्हणतात. परंतु 1991 च्या आर्थीक धोरणामुळे LPG मुळे आरक्षण समाप्त झाले आहे. नवीन भरतीही चालू नाही सध्या एकूनच क्षेत्रामध्ये खाजगी भरती होत आहे. संवीधानाची अमलबजावणी पुर्णत: नाही. बजेटमध्ये शिक्षणासाठी 2.61% आर्थिक तरतुद होते कसे लावणार प्रत्येक कूटूंबातील एका व्यक्तीस नोकरी?

यासाठी सच्चा प्रतिनिधी संसदेत असावा लागतो, खाजगी क्षेत्र बंद करुन सार्वजनिक क्षेत्रात वाढ करावी लागते, सर्वाची जातीनीहाय जनगणना करावी लागते, त्यांच्या संख्येनुसार आरक्षण लागू करावे लागते, संवीधानाची 100 टक्के अमल करावा लागते, शिक्षणात बजेटमध्ये तरतुद किमान 20 टक्के करावी लागते तर प्रत्येक कूटूंबातील एक व्यक्ती नौकरीस लावू शकता. 'मेक इन इंडीयाच्या' घोषणेला आता जनता बळी पडणार नाही. दुसरा एक उदा. पाहीले तर आरोग्य सेवा प्रत्येक गावात आणू हे राजकीय गुंड लोक **क्लीनीकल इस्टॅबीलीसमेंट एक्ट-2010** च्या माध्यमाने Health Department झीरो वर आणून ठेवत आहेत कशी करणार प्रत्येक गावात आरोग्य सेवा? माझ्या माहीती प्रमाणे Health Department 2022 मध्ये हे BJP सरकार एकूणच बंद करणार असा अर्थ होवू शकतो?

स-न 1950-51 मध्ये कृषी क्षेत्राचा सकळ उत्पन्नामध्ये (GDP) 53.1 टक्के वाटा होता. सध्या 2014-15 मध्ये ृषी क्षेत्राचा GDP मधील हिस्सा 13.9 टक्के झाला आहे. म्हणजे गेल्या 65 वर्षात कृषी क्षेत्राच्या वाट्यात चार पटीने घट झाली आहे. भारतातील 125 कोटी जनता पैकी 65 टक्के जनता शेती व मजूरीवर अवलंबून आहे. कृषी त्राच्या वृध्दी दरात सातत्याने घट होत आहे. कृषी क्षेत्रातील शेतकरी वर्ग आवश्यक गुंतवणूक करण्यासाठी पायाभूत सुविधा, सिंचन क्षमता, विजनिर्मिती, धान्य साठवणे, खते, बी-बीयाने, शेतीवरील आधारीत उद्योग या सुविधामध्ये गुंतवणुक करण्यासाठी **'स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प'** असण्याची गरज आहे.

सिंचाईसाठी 'प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना' म्हणुन 5300 कोटीची तरतुद आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या जनतेला पाण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद फक्त 0.29 टक्के आहे. अंदाजपत्रकीय आर्थीक तरतुद जर इतकी कमी आहे. तर मुलनिवासी बहुजनातून सध्या एकतरी असा प्रतिनिधी आहे का संसेदेत आवाज उठवणारा माझ्या माहीतीनुसार एकही दिसत नाही? म्हणुन शेतकरी हवालदील झोलला दिसुन येतो यामुळेच आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्याला आल्याची दिसते.

**'भारत मूक्ती मोर्चा'** नावाचे एक संघटन आहे. त्यामध्ये अनेक समूहातील लोक आहेत. याचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. वामन मेश्राम आहेत. मूलनिवासी बहुजनाची स्वातंत्र्याची लढाई लढत आहे. 15 ऑगस्ट 1947 ला जो स्वातंत्र्य मिळाला आहे. तो मुलनिवासी बहुजनासाठी असता तर संवीधानाची संपूर्ण अमलबजावणी झाली असती. मागताक्षणी प्रत्येकाला काम मिळाला असता, उच्च शिक्षित झाले असते. बेरोजगारी निर्माण झाली नसती, भुकबळीच्या स्थितीत 83 कोटी लोक नसते, आत्महत्या झाल्या -नसल्या याचा अर्थ स्वातंत्र्य मिळाले नाही.

म्हणुन वामन मेश्राम साहेब, राष्ट्रव्यापी जनआंदोलन निर्माण करत आहेत या आंदोलनामुळे स्वातंत्र्य मिळाले तरच आर्थीक वर्षातील अर्थसंकल्प समान वाटप होईल. तसेच आर्थीक स्थैर्य प्राप्त करायचे असेल तर उत्पन्न व खर्च असा समतोल असेल.

## संदर्भ :-


1) दैनिक सकाळ दि. 23 मार्च 2015 पान क्र. 8

2) दैनिक मुळनिवासी नायक दि. 22 मार्च 2015 पान क्र. 3

3) 'बहुजन मुक्ती पार्टी' राष्ट्रव्यापी बजट जलाओ अभियान दि. 22 मार्च 2015 (राज्य, जिल्हा, तहसील मुख्यालय)

4) Key features of Budget 2015-16 February 28, 2015.

5) योजना समर्पित मासिक, मार्च 2015.